# एका छोट्याशा पक्ष्याचे मिशन

या वर्षीच्या मे महिन्यातील एके दिवशी सकाळी — ज्या सप्ताहात बाबा मुक्तानंदांचा जन्मदिवस होता — गुरुमाई आश्रमातील एका खिडकीजवळून चालत जात असताना खिडकीच्या बाहेरील बाजूस एक छोटा पक्षी त्यांच्या दृष्टीस पडला. तो पक्षी एका दगडी फरशीवर बसला होता, जी काचेच्या पलीकडील बाजूला अगदी लागूनच होती. तो पक्षी तपकिरी रंगाचा होता ज्याच्या डोक्यावर नारिंगी रंगाची रेषा होती आणि पोटावर पांढरे ठिपके होते. त्या पक्ष्याने आपली छाती फुगवलेली होती, त्यामुळे तो जास्तच गुबगुबीत दिसत होता.

तो आपली पिसे फुगवून असा का बसला असेल या कुतूहलापोटी गुरुमाई त्याच्याकडे पाहत असतानाच, एक पाळीव मांजर त्यांच्या मागून चालत आले आणि त्यांच्या शेजारी उभे राहिले.

आता, मांजराचेही त्या छोट्या पक्ष्याकडे लक्ष जाताच त्यालादेखील त्या पक्ष्याविषयी *खूपच* कुतूहल वाटू लागले.

आपले नाक त्याने काचेच्या तावदानाला टेकवले. त्या पक्ष्याच्या जितके अधिक निकट जाता येईल, तितके निकट जाण्याची त्याची इच्छा होती.

मांजराच्या उपस्थितीतदेखील तो पक्षी मात्र अगदी निर्भयपणे बसून होता. अजूनही तो पक्षी काचेच्या तावदानापासून काही इंचांच्या अंतरावरच होता. तुम्ही असे म्हणू शकला असता की, मांजरीचे नाक हे अक्षरशः पक्ष्याच्या चोचीला टेकलेले होते!

जवळजवळ दहा मिनिटे, वीस मिनिटे, तीस मिनिटे, तो पक्षी आतील बाजूकडे निरखून पाहत तिथेच थांबला. तो केवळ निरखत राहिला. . . निरखत राहिला. . . आणखीनच निरखत राहिला. . . गुरुमाईंना आणि त्या मांजराला. तो पुन्हापुन्हा थोडीफार हालचाल करत होता. तो आपली मान तिरपी करत होता — एकदा इकडे आणि एकदा तिकडे. गुरुमाईंना आणखी स्पष्टपणे पाहण्याचा प्रयत्न तो करत होता. मांजरालाही आणखी स्पष्टपणे पाहण्याचा प्रयत्न तो करत होता.

असे करत-करत तो पक्षी इंचाइंचाने निकट येत होता. गुरुमाईंच्या मनात विचार येत होता की, तो पक्षी असे तर विचारत नाही ना की, “तुम्ही मला आत घ्याल का? कृपया दरवाजा उघडा!”

जसजसा काळ लोटला, तसतशी गुरुमाईंना पक्ष्याची काळजी वाटू लागली. त्यांना वाटत राहिले की, पक्ष्याची तब्बेत खरोखरच बरी आहे ना, की त्याला मदतीची गरज आहे.

पंचेचाळीस मिनिटांनी, गुरुमाई त्या मांजराला म्हणाल्या, “आपण त्या पक्ष्याला याची जाणीव करून दिली पाहिजे की, आपण त्याच्यावर किती प्रेम करतो.”

म्हणून मग गुरुमाई त्या मांजरासह खिडकीच्या अधिक जवळ गेल्या. तो पक्षीदेखील आपल्या इवल्या-इवल्या नाजूक पावलांनी ठुमकत, उड्या मारत घाईघाईने काचेच्या अगदी जवळ आला.

आणि मग जेव्हा ते सर्वजण म्हणजेच गुरुमाई ते मांजर आणि तो पक्षी खरोखरच जवळ आले, तेव्हा गुरुमाई म्हणाल्या, “आमचे तुझ्यावर प्रेम आहे.”

गुरुमाईंनी असे म्हणताच त्या पक्ष्याने खिडकीकडे पाठ फिरवली. त्याने विस्तीर्ण निळ्या आकाशाकडे दृष्टी टाकली, आपले पंख पसरवले आणि पंखांमध्ये हवा भरून घेत आकाशात उंच भरारी घेतली आणि तो भुर्रकन उडून गेला.

आणि तो पक्षी आकाशात आनंदाने उंच-उंच सूर मारत असताना श्रीगुरुमाई व ते मांजर अनिमिष नेत्रांनी त्याच्याकडे पाहत होते.

© २०१९ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.